## APPLICATION FOR INFORMATION UNDER CENTRAL RIGHT TO INFORMATION ACT, 2005

To,
The Public Information Officer (सचीव)
Mira Bhayander Municipal Corporation
Bhayander (West),
Dist. Thane-401 101.

Date: 02/02/2018

MBMC/MS/IWE/2018/108
नगरसचिव विभाग
स.प./न.प./ज.प./आ.क्र. 90 2096-95
दिनांक :- 08/02/95

| | | | |
|---|---|---|---|
| 11. | NAME OF THE APPLICANT | : | Mr. Chandan B. More, Mob.9324632118 |
| 2. | ADDRESS | : | Laxmi Palace, 76, Mathuradas Road, Kandivali (East), Mumbai-400 067. |
| 3. | PARTICULARS OF INFORMATION | : | Request to provide the "Copy of Tharav" |
| | i. Subject matter of information | : | Please provide copy of Tharav regarding letting or not letting vacant Plots for Marriage or any other purpose. MBMC Limit |
| | ii. The period to which information relates | : | Since beginning of MBMC to till date. |
| | iii. Description of the information required | : | Kindly provide information and certified copy of the Tharav . |
| | iv. Whether information is required by post or in person. The actual postal charges shall be included in additional fees | : | In person |
| | v. In case by post (Ordinary, Registered or Speed.) | : | N.A. |
| 4 | Whether the applicant is below poverty line (if yes, attach the photo copy of the proof thereof) | : | N.A. |

**Place: Mumbai**
**Date: 02/02/2018**

**Yours truly,**
3-2-2018
**(Mr. Chandan B. More)**

**N. B.** The aforesaid information is required as per the provision of the Central Right to Information Act, 2005 within the time and stipulation stated therein, kindly note.

o/c

# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय,
छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.) ता.जि. ठाणे 401 101
नगरसचिव विभाग

जा.क्र.मनपा/सचिव/मा.अ./१७ /2018 | दिनांक :- १२/०२/2018

प्रति,
श्री. चंदन बी. मोरे,
लक्ष्मी पॅलेस, 76,
मथुरदास रोड, कांदिवली (पूर्व),
मुंबई - 400067.

**विषय :-** **<u>केंद्र शासनाचा माहितीचा अधिकारी 2005.</u>**
**ठरावाची सत्यप्रत मिळणेबाबत.**

**संदर्भ :-** **आपणांकडील दि. 02/02/2018 रोजीचा माहिती अधिकारातील अर्ज.**

महोदय,

उपरोक्त विषयांकित संदर्भित पत्रान्वये आपण महानगरपालिका क्षेत्रातील मोकळया जागेचा वापर लग्न कार्यासाठी केला जातो त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करणेबाबत धोरण ठरविणेबाबतच्या ठरावाची मागणी केलेली आहे. त्याअनुषंगाने आपणांस मा. महासभा दि. 08/12/2017 प्रकरण क्र. 46, ठराव क्र. 43 या ठरावाची सत्यप्रत या पत्रासोबत जोडून देत आहोत.

सदर माहितीबाबत आपले समाधान न झाल्यास अपिलीय अधिकारी तथा प्र. नगरसचिव श्री. वासुदेव शिरवळकर, नगरसचिव विभाग, तिसरा मजला, मुख्य कार्यालय, स्व. इंदिरा गांधी भवन, भाईंदर (प.) यांचेकडे 30 दिवसात प्रथम अपिल दाखल करता येईल.

कळावे.

ठराव मिळाला

१२/२/१८

**(कैलास दा. म्हात्रे)**
**जनमाहिती अधिकारी तथा लिपीक**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**
**(भ्रमणध्वनी क्र. 9867077799)**

pc 2\\User001\d\Mahiti Adhikar\Letter - Chandan More.docx

# <u>मिरा-भाईंदर महानगरपालिका</u>

## <u>मिळकत विभाग</u>

### मा. महासभा दि. 08/12/2017

**प्रकरण क्रमांक ( 46 ) :-** महानगरपालिका क्षेत्रातील मोकळ्या जागेचा वापर लग्नकार्य व वाणिज्य वापरासाठी केला जातो, त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करणेबाबत धोरण ठरविणे.

**ठराव क्रमांक ( ४३ ) :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर खाजगी मालकीचे भुखंड आहेत. सदर भुखंडावरील मोकळ्या जागेचा वापर खाजगी मालकाकडुन लग्न कार्य, खाजगी कार्यक्रम व वाणिज्य स्वरुपाच्या वापरासाठी करण्यात येतो. सदर वापराकरीता महानगरपालिकेची परवानगी घेण्यात येत नाही. सदर मोकळ्या जागेवर कार्यक्रमानंतर मोठ्या प्रमाणावर कचरा, घाण जमा होऊन परिसर अस्वच्छ होतो. कार्यक्रमासाठी मोठ्या प्रमाणावर लोकांची गर्दी होत असल्याने वाहतुकीस, रहदारीस अडथळा निर्माण होत असतो. तसेच काही मोकळ्या जागेवर अनधिकृतपणे मार्बल, नर्सरी इ. व्यावसायिक वापर होत असतो. सदर बाबत अग्निशमन विभाग, पोलिस विभाग व वाहतुक विभागाला देखील याबाबत कल्पना नसल्याने काही अपघात घडल्यास मोठी आपत्कालीन परिस्थिती उद्भवु शकते.

सबब खालीलप्रमाणे धोरण निश्चित करण्यात येत आहे.

1) मिरा भाईंदर महापालिका कार्यक्षेत्रात मोकळ्या जागांवर लग्न कार्य, व्यावसायिक, खाजगी व इतर सार्वजनिक कार्यक्रम मर्यादित कालावधीकरीता असल्यास महानगरपालिकेची परवानगी घेणे आवश्यक आहे. सदर कार्यक्रमासाठी प्रती दिवशी रु.10000/- याप्रमाणे परवानगी शुल्क आकारले जाईल. महानगरपालिकेची परवानगी न घेतल्यास प्रती दिवशी रु.30,000/- याप्रमाणे दंडात्मक शुल्क वसुल करण्यात येईल.

2) ज्या मोकळ्या जागांचा वापर मार्बल, नर्सरी व अन्य व्यावसायिक कारणासाठी नियमितपणे होत असेल अशा मालमत्तांची कर आकारणी प्रती रु.0.50/- चौ. फुट दराप्रमाणे करण्यात येईल किंवा किमान रु.10,000/- यापैकी जे जास्त असेल ती रक्कम घेण्यात येईल. सदर कराचा भरणा झाल्यानंतरच अशा व्यवसायिक वापरासाठी महानगरपालिकेमार्फत परवानगी देण्यात येईल अन्यथा सदर मोकळ्या जागांना प्रती रु.2/- चौ. फुट दराप्रमाणे याप्रमाणे कर आकारणी करण्यात येईल.

3) सदर जागेवर निर्माण होणारा कचरा संबधित जागा मालकाने स्व-खर्चाने स्वच्छ करून जागा व परीसर स्वच्छ ठेवणे बंधनकारक राहिल याची दक्षता प्रभाग अधिकारी यांनी घ्यावी.

4) मोकळ्या जागेवर महानगरपालिकेच्या परवानगीशिवाय कोणताही वापर व दुरूपयोग होणार नाही याची संबंधीत विभागाने दक्षता घेण्यात यावी.

5) ज्या मोकळ्या जागेचा वापर महानगरपालिकेची परवानगी न घेता व्यावसायिक कारणासाठी होत आहे. तथापि त्याची कर आकारणी न झाल्यास वरीलप्रमाणे सदर जागेची कर आकारणी किंवा दंडात्मक शुल्काची कार्यवाही महानगरपालिकेने करावी व सदर रक्कमेचा भरणा जमिन मालकाने न केल्यास सदर जमिन मालकाची मिरा भाईंदर महापालिका कार्यक्षेत्रात अन्य् मालमत्ता असल्यास त्यांच्या मालमत्ता कर देयकातून सदर रक्कम वसुल करावी अन्यथा सदरचा बोजा त्यांच्या 7/12 वर चढविण्याबाबत कार्यवाही करण्यात येईल.

6) नगररचना विभागाने अशा मोकळ्या जागांवर बांधकाम परवानगी देताना वरीलप्रमाणे शुल्क, दंडात्मक शुल्क किंवा कर भरणा झाले असल्याची खातरजमा करुनच परवानगी दयावी.

सुचक :- श्री. प्रशांत दळवी अनुमोदन :- श्रीम. हेतल परमार

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|---|---|
| १ | शाह रिटा सुभाष | १ | ढवण निलम हरीशचंद्र | |
| २ | पाटील रोहिदास शंकर | २ | कदम अर्चना अरुण | |
| ३ | गोहिल शानू जोरावर सिंह | ३ | नलावडे दिनेश दगडु | |
| ४ | कांगणे मीना यशवंत | ४ | परदेशी गिता हरीश | |
| ५ | सिंह मदन उदितनारायण | ५ | सय्यद नुरजाहाँ नाझर हुसेन | |
| ६ | शेट्टी गणेश गोपाळ | ६ | शेख अमजद गफार | |
| ७ | पाटील प्रभात प्रकाश | ७ | पाटील जयंतीलाल गुरूनाथ | |
| ८ | रावल मेघना दिपक | ८ | घरत तारा विनायक | |
| ९ | शाह राकेश रतिशचंद्र | ९ | पांडे स्नेहा शैलेश | |
| १० | सिंग श्रीप्रकाश जिलेदार | १० | आमगावकर हरिश्चंद्र रामचंद्र | |
| ११ | पाटील धृवकिशोर मन्साराम | ११ | शिर्के अनंत गेणू | |
| १२ | जैन सुनिता रमेश | १२ | पाटील वंदना विकास | निरंक |
| १३ | जैन राजेंद्र भवरलाल | १३ | पाटील संध्या प्रफुल्ल | |
| १४ | भूप्ताणी रक्षा सतीश (शाह) | १४ | पाटील प्रविण मोरेश्वर | |
| १५ | व्यास रवि वासुदेव | १५ | भोईर कमलेश यशवंत | |
| १६ | रकवी वैशाली गजेंद्र | १६ | पाटील अनिता जयवंत | |
| १७ | अग्रवाल सुशील गोपीकिशन | १७ | भोईर भावना राजू | |
| १८ | खंडेलवाल सुरेश जगदीश | १८ | भोईर राजू यशवंत | |
| १९ | डॉ. पाटील प्रिती जयप्रकाश | १९ | शेख रुबीना फिरोझ | |
| २० | मेहता डिंपल विनोद | २० | डिसा मर्लिन मर्विन | |
| २१ | शिंदे रुपाली वसंत (मोदी) | २१ | मेहरा राजीव ओमप्रकाश | |
| २२ | थेराडे संजय अनंत | २२ | भट दीप्ती शेखर | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २३ | मुखर्जी अनिता बबलू | २३ | सपार उमा विश्वनाथ | |
| २४ | वैती चंद्रकांत सिताराम | २४ | अहमद साराह अकरम | |
| २५ | पारधी सुजाता यशवंत | २५ | इनामदार जुबेर अब्दुल्ला | |
| २६ | म्हात्रे सचिन केसरीनाथ | २६ | शेख अशरफ मोहम्मद इब्राहीम | |
| २७ | यादव मिरादेवी रामलाल | २७ | बगाजी शर्मिला विन्सन्ट | |
| २८ | म्हात्रे मोहन गोपाळ | २८ | बांड्या एलायस दुमिंग | |
| २९ | सोनार सुरेखा प्रकाश | | | |
| ३० | भोईर विणा सुर्यकांत | | | |
| ३१ | मांजरेकर आनंद दत्ताराम | | | |
| ३२ | बेलानी हेमा राजेश | | | |
| ३३ | दळवी प्रशांत ज्ञानदेव | | | |
| ३४ | गजरे दौलत तुकाराम | | | |
| ३५ | नाईक विविता विवेक | | | |
| ३६ | सोंस नीला बर्नाड | | | |
| ३७ | राय विजयकुमार सिस्थन नारायण | | | |
| ३८ | परमार हेतल रतिलाल | | | |
| ३९ | जैन दिनेश तेजराज | | | |
| ४० | भावसार वंदना संजय | | | |
| ४१ | शाह सीमाबेन कमलेश | | | |
| ४२ | दुबे मनोज रामनारायण | | | |
| ४३ | भोईर जयेश भानुदास | | | |
| ४४ | म्हात्रे नयना गजानन | | | |
| ४५ | म्हात्रे विनोद काशिनाथ | | | |

ठराव बहुमताने मंजूर

Dmehta

महापौर

मिरा भाईंदर महानगरपालिका